SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 **website : www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९००० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ E-Mail : statcell@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF – 28th Rank

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/ 218 दिनांक : 2 MAR 2017

## स्मरणपत्र क्रमांक १

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
**सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,**

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१६-१७ माहिती नोंदणीचे डिसीएफ वेबपोर्टलवर अपलोड करणेबाबत.**

**संदर्भ :** मा. डॉ. धनराज माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्रमांक उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०१६-१७/१९२६, दिनांक १४/०२/२०१७ चे पत्र.

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१६-१७ महाविद्यालयांचा डिसीएफ अपलोड करण्याबाबतचा आढावा घेतला असता दिनांक ०२/०३/२०१७ अखेर शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित २८३ महाविद्यालयांच्या पैंकी ७९ महाविद्यालयांनी डिसीएफ अपलोड केल्याचे निर्देशनास आलेले आहे. संलग्नित महाविद्यालयांचे डिसीएफ II अपलोड करण्याबाबतचे काम अत्यंत धीम्या गतीने चालू आहे. उपरोक्त संदर्भाकिंत दिनांक १४/०२/२०१७ रोजीच्या मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी सदर कामाबद्दल नाराजी व्यक्त केलेली आहे.

अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१६-१७ महाविद्यालयांचा डिसीएफ अपलोड करण्याबाबत शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांसाठी सांख्यिकी कक्षामार्फत जिल्हानिहाय कोल्हापूर,सातारा व सांगली प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते हे आपल्याला ज्ञातच आहे. सदर प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये डिसीएफ II मध्ये माहिती नोंद करण्याबाबत तसेच डिसीएफ अपलोड करण्याबाबत आपल्या नोडल अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले होते.

तरी ज्या महाविद्यालयांनी अद्याप डिसीएफ अपलोड केलेला नाही त्या महाविद्यालयाच्या AISHE नोडल अधिकारी यांनी आपल्या महाविद्यालयाचा डिसीएफ II दिनांक १५/०३/२०१७ रोजीपर्यत तात्काळ AISHE वेबपोर्टलवर अपलोड करून विद्यापीठास सहकार्य करावे. AISHE वेबपोर्टलवर डिसीएफ अपलोड करण्याची लिंक बंद झाल्यास आपल्या महाविद्यालयांची माहिती नोंद करता येणार नाही याची आपण नोंद घ्यावी व याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

**उपकुलसचिव**
**सांख्यिकी कक्ष,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**